# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 23 November 2024
## Time 01.00 to 01.05 PM
## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.**

****

- विधानसभा निवडणूक निकालांत महायुतीला जनतेचा स्पष्ट कौल मिळत असल्याचे संकेत
- विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा दणदणीत विजय
- महायुतीच्या अडीच वर्षांच्या कामांची जनतेकडून पोचपावती–मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया

आणि

- बॉर्डर गावसकर क्रिकेट कसोटी मालिकेच्या पहिल्या सामन्यात भारतीय संघ १२५ धावांनी आघाडीवर

****

राज्य विधानसभा निवडणुकीच्या निकालांमध्ये महायुतीला जनतेचा स्पष्ट कौल मिळत असल्याचे संकेत दिसून येत आहेत. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी आपापल्या मतदार संघात दणदणीत विजय मिळवला आहे.

एकूण २८८ मतदारसंघापैकी भाजपनं तीन जागांवर विजय मिळवला, तर ९० जागांवर भाजप उमेदवार आघाडीवर आहेत. शिवसेनेनं एका जागेवर विजय मिळवला असून, ४९ जागांवर शिवसेना उमेदवार आघाडीवर आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसनं एका जागेवर विजय मिळवला, तर ३२ जागांवर त्यांचे उमेदवार आघाडी घेतली आहेत. महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस १७, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष १८, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष १२ जागांवर, तर इतर आणि अपक्ष उमेदवार १८ जागांवर आघाडीवर आहेत.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधीमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे तीनही ज्येष्ठ नेते सध्या पिछाडीवर असल्याचं दिसून येत आहे.

****

शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे ठाणे जिल्ह्यातल्या कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातून एका लाखाहून अधिक मताधिक्यानं विजयी झाले. नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघातून भाजपचे देवेंद्र फडणवीस एक लाख २४ हजार मताधिक्याने, तर बारामती मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार विजयी झाले आहेत. आंबेगाव मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे दिलीप वळसे पाटील ५०० मतांनी विजयी झाले. वडाळा मतदारसंघातून भाजपचे कालिदास कोळंबकर, कणकवली मधून भाजपचे नितेश राणे, तर परळी मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे विजयी झाल्याचं वृत्त आहे. याबाबत अधिकृत घोषणा अद्याप बाकी आहे.

****

मुंबईत अंधेरी पूर्व मतदारसंघात शिवसेनेचे मुर्जित पटेल, अंधेरी पश्चिम मधून भाजपचे अमित साटम, अणुशक्तीनगरमधून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे फहाद अहमद, कुलाबा मधून भाजपचे राहुल नार्वेकर, दहीसरमधून भाजपच्या मनिषा चौधरी, धारावीमधून काँग्रेसच्या ज्योती गायकवाड, डोंबिवली मधून भाजपचे रविंद्र चव्हाण तर गोरेगाव मतदार संघातून भाजपच्या विद्या ठाकूर, आघाडीवर आहेत.

वरळी मतदारसंघातून शिवसेनेचे मिलिंद देवरा अवघ्या ६०० मतांनी आघाडीवर आहे, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आदित्य ठाकरे सध्या पिछाडीवर आहेत. माहिम मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महेश सावंत आघाडीवर असून, शिवसेनेचे सदा सरवणकर दुसऱ्या, तर मनसेचे अमित ठाकरे तिसऱ्या क्रमांकावर आहेत. वांद्रे पूर्व मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वरुण सरदेसाई आघाडीवर, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे झिशान सिद्दीकी दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

****

शिर्डी विधानसभा मतदारसंघातून भाजपचे राधाकृष्ण विखे पाटील जवळपास ३० हजार मतांनी आघाडीवर आहेत. कर्जत जामखेडमधून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे रोहित पवार आघाडीवर आहेत.

वाशिम जिल्ह्यात वाशिम शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सिद्धार्थ देवळे, कारंजा मतदारसंघातून भाजप महायुतीच्या सई डहाके, सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ–मालवण मतदारसंघातून महायुतीचे निलेश राणे, सावंतवाडी मधून शिवसेनेचे दीपक केसरकर आघाडीवर आहेत. धुळे शहर मतदारसंघातून भाजपचे अनुप अग्रवाल, यवतमाळ जिल्ह्यात पुसद मतदारसंघात महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे इंद्रनील नाईक, गडचिरोली मतदारसंघातून भाजपचे डॉ. मिलिंद नरोटे, शहादा मतदारसंघात भाजपचे राजेश पाडवी तर आरमोरी मतदारसंघातून भाजपचे कृष्णा गजबे आघाडीवर आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या औरंगाबाद मध्य मतदारसंघातून महायुतीचे शिवसेनेचे प्रदीप जैस्वाल, औरंगाबाद पश्चिम मधून शिवसेनेचे संजय शिरसाट, तर औरंगाबाद पूर्व मधून एमआयएमचे इम्तियाज जलिल २३ हजार ५३९ मतांनी आघाडीवर आहेत.

गंगापूर मतदारसंघातून भाजपचे प्रशांत बंब, वैजापूर मधून शिवसेनेचे रमेश बोरनारे, कन्नड मधून भाजपच्या संजना जाधव, फुलंब्री मधून भाजपच्या अनुराधा चव्हाण, सिल्लोडमधून शिवसेनेचे अब्दुल सत्तार, तर पैठण मतदारसंघातून शिवसेनेचे विलास भुमरे आघाडीवर आहेत.

****

बीड जिल्ह्यातल्या बीड विधानसभा मतदारसंघात आठव्या फेरीनंतर महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार योगेश क्षीरसागर ५०८ मतांनी आघाडीवर आहेत. आष्टी मधून सोळाव्या फेरीनंतर भाजप महायुतीचे सुरेश धस ४४ हजार ५१८ मतांनी, माजलगाव मधून आठव्या फेरीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मोहन जगताप, केज मतदारसंघातून भाजप महायुतीच्या नमिता मुंदडा, तर गेवराई मधून तिसऱ्या फेरीनंतर महायुतीच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे विजयसिंह पंडित आघाडीवर आहेत.

****

जालना जिल्ह्यातल्या बदमापूर मतदारसंघातून चौथ्या फेरीनंतर भाजप महायुतीचे नारायण कुचे तीन हजार ६०० मतांनी, जालना मतदारसंघातून शिवसेनेचे अर्जुन खोतकर, घनसावंगी मतदारसंघातून शिवसेनेचे हिकमत उढाण, तर भोकरदन मधून भाजपाचे संतोष दानवे तिसऱ्या फेरीअखेर तीन हजार २७८ मतांनी आघाडीवर आहेत.

****

लातूर जिल्ह्यात लातूर शहर मतदारसंघातून पहिल्या फेरीनंतर महाविकास आघाडीचे काँग्रेसचे अमित देशमुख १६७ मतांनी आघाडीवर आहेत. लातूर ग्रामीणमधून काँग्रेसचे धीरज देशमुख, अहमदपूर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे बाबासाहेब पाटील, उदगीर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय बनसोडे, निलंग्यातून भाजपचे संभाजी पाटील निलंगेकर, तर औसा मतदारसंघातून भाजपचे अभिमन्यू पवार आघाडीवर आहेत.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या उस्मानाबाद मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कैलास घाडगे पाटील, तुळजापूर मधून भाजपचे राणा जगजितसिंह पाटील, उमरग्यातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रवीण स्वामी, तर परंडा मतदारसंघातून शिवसेनेचे तानाजी सावंत आघाडीवर आहेत.

****

नांदेड जिल्ह्यातल्या नांदेड दक्षिण मतदारसंघातून काँग्रेसचे मोहन हंबर्डे, नांदेड उत्तर- शिवसेनेचे बालाजी कल्याणकर, नायगाव- भाजपचे राजेश पवार, देगलूर भाजपचे जीतेश अंतापूरकर, मुखेड-भाजपचे तुषार राठोड, भोकर -भाजपच्या श्रीजया चव्हाण, लोहा - राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रताप पाटील चिखलीकर, किनवट - भाजपचे भीमराव केराम, तर हदगाव मतदारसंघातून शिवसेनेचे बाबुराव कदम कोहळीकर आघाडीवर आहेत.

नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत तिसऱ्या फेरीअखेर भाजपचे संतुक हंबर्डे १२ हजारांहून अधिक मतांनी आघाडीवर आहेत.

****

हिंगोली जिल्ह्यात वसमत मतदारसंघातून पाचव्या फेरीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे राजु नवघरे, हिंगोली मधून भाजपचे तानाजी मुटकुळे, तर कळमनुरी मतदारसंघातून शिवसेनेचे संतोष बांगर आघाडीवर आहेत.

****

परभणी जिल्ह्यात परभणी मतदारसंघातून शिवसेनेचे आनंद भरोसे, गंगाखेड मधून शिवसेनेचे विशाल कदम, पाथरी मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश विटेकर, तर जिंतूर मतदारसंघातून भाजपच्या मेघना बोर्डीकर

****

महायुतीच्या सरकारने अडीच वर्षे केलेल्या कामांची पोचपावती जनतेने दिली असल्याची प्रतिक्रिया, शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. लाडकी बहीण, लाडका भाऊ, लाडका शेतकरी आणि लाडक्या ज्येष्ठ नागरिकांनी महायुतीला साथ दिल्याने महायुतीला अभूतपूर्व विजय दिल्याची भावना शिंदे यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्रिपदाबाबत महायुतीचे प्रमुख नेते एकत्र बसून निर्णय घेतील, असं त्यांनी सांगितलं.

****

झारखंड विधानसभा निवडणुकीसह देशातल्या ४८ विधानसभा मतदारसंघातल्या तसंच केरळमधल्या वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी देखील आज होत आहे. यामधये उत्तर प्रदेशातल्या नऊ, राजस्थानातल्या सात, पश्चिम बंगालमधल्या सहा, आसाममध्ये पाच, बिहार आणि पंजाबमधे प्रत्येकी चार, कर्नाटकात तीन, तर केरळ, मध्य प्रदेश आणि सिक्किममध्ये प्रत्येकी दोन, तर छत्तीसगड, गुजरात, आणि उत्तराखंडमधल्या प्रत्येकी एका जागेचा समावेश आहे.

झारखंडमध्ये आतापर्यंत हाती आलेल्या माहितीनुसार भाजप २७, तर झारखंड मुक्ती मोर्चा २८ जागांवर आघाडीवर आहे.

वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या प्रियंका गांधी तीन लाखाहून अधिक मतांनी आघाडीवर आहे.

****

राज्य विधानसभा निवडणुकीत प्रमुख राजकीय पक्ष वगळता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं १२५, तर वंचित बहुजन आघाडीनं २०० उमेदवार रिंगणात उतरवले होते. मात्र मतपेटीत याचा फारसा परिणाम जाणवत नसल्याचं दिसून येत आहे. आत्तापर्यंतच्या कलांनुसार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला फक्त १ पूर्णांक ५८ शतांश टक्के मतं मिळाली आहेत. दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीला मिळालेल्या मतांचं प्रमाण नगण्य असून त्यांचे उमेदवार मुख्य शर्यतीच्याही बाहेर पडल्याचं चित्र आहे. तर नोटाला शून्य पूर्णांक ७८ शतांश मतदारांनी पसंती दिली आहे.

****

क्रिकेट

ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर गावसकर क्रिकेट कसोटी मालिकेच्या पहिल्या सामन्यात आज दुसऱ्या दिवशी भारतीय संघ १२५ धावांनी आघाडीवर आहे. आज सकाळी यजमान संघाचा पहिला डाव १०४ धावांवर संपुष्टात आला. कर्णधार जसप्रीत बुमराहने सर्वाधिक पाच बळी घेतले. पदार्पणाचा सामना खेळत असलेल्या

हर्षित राणाने तीन तर मोहम्मद सिराजने दोन बळी घेतले. त्यानंतर भारतीय संघाच्या दुसऱ्या डावात आतापर्यंत बिनबाद ७९ धावा झाल्या आहेत. यशस्वी जयस्वाल ३९ तर के एल राहुल ३२ धावांवर खेळत आहेत.

****

सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारताच्या जोडीनं चायना मास्टर्स २०२४च्या पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली. शेंझेन इथं सुरू असलेल्या या स्पर्धेत सात्विक आणि चिराग यांनी डेन्मार्कच्या जोडीचा २१-१६, २१-१९ अशा थेट गेम्समध्ये पराभव केला. आता उपांत्य फेरीत त्यांचा सामना जपान आणि कोरिया यांच्यातल्या विजेत्या जोडीशी होणार आहे. दरम्यान, पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत लक्ष्य सेन याला डेन्मार्कच्या अँडर्स अँडरसनकडून २१-१८, २१-१५ असा थेट गेम्समध्ये पराभव पत्करावा लागला.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या रविवारी आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहे. हा या कार्यक्रमाचा ११६ वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरुन उद्या सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम प्रसारित होईल.

****